<u>नियमित निवडसुची-२०२५-२६</u>
**राज्य राखीव पोलीस बलामधील "सशत्र पोलीस उपअधीक्षक/ सहायक समादेशक" या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन आदेश क्र. एच.डी.११०२/१/२०२६/पोल-१अ (ई/ ऑफीस क्र.१६५०५५०)**
दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई:- ४०००३२.
दिनांक :- ३० मे २०२६.

१. शा.नि., सा.प्र. वि., क्र.एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र.१५९/ कार्या.-१२, दि. ०१.०८.२०१९.
२. शा.नि., सा.प्र. वि., क्र.बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/२/नि.सु.२५-२६(सहा. समादेशक)/७९/२०२४, दि.२९.०१.२०२६.

<u>शासन आदेश</u>:-

"सशस्त्र पोलीस निरीक्षक" या संवर्गातील पदावरुन "सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल" या संवर्गातील पदावर पदोन्नती देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या "सशस्त्र पोलीस निरीक्षक" या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमित निवडसूची २०२५-२६ यामध्ये समाविष्ट असलेल्या, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये निर्दिष्ट अधिकारी यांना "सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल" या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात, पुढील अटींवर, पदोन्नती देण्यात येत असुन त्यांची स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट पदावर, याद्वारे, पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे,

| <u>अ.क्र</u> | <u>अधिका-याचे नाव</u> (श्री./ श्रीम.) *[नियत वयमानाने दिनांक ३१.०५.२०२६ रोजी सेवानिवृत्त]* | <u>पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण</u> |
|---|---|---|
| (१) | (२) | (४) |
| १ | श्री. नवलसिंग गोंडु पवार | राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३, जालना |

अटी:-

१) उक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) उक्त पदोन्नती ही शा.नि., सा.प्र. विभाग, क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा (regularization) व सेवाज्येष्ठतेचा (seniority) कोणताही हक्क असणार नाही.

४) उक्त निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याच्या अधीन तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / न्यायालय यांचे आदेश, कायदा व सुव्यवस्था, इत्यादी लक्षात घेऊन पुढील उचित कार्यवाही करावी.

३. हा शासन आदेश, सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२ न मधील तरतुदींनुसार सर्वोच्च सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५३०१६०४३१९९२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP SAMPATRAO MADKAR

Digitally signed by PRATAP SAMPATRAO MADKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=691BA5CDE50BE5AD4D70B5410E666A3F513B4FD3934F0227B3AAB4FF49EE9941, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B6C9D92AA5599BE94C2F37BF0363AAF3D243DE73A6A2F15A0AE751006929371A, cn=PRATAP SAMPATRAO MADKAR
Date: 2026.05.30 16:52:28 +05'30'

(प्रताप सं. माडकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) मा. अप्पर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत-**

१) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, परिक्षेत्र नागपुर.
३) समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,गट क्र.३ जालना.
४) संबंधित पोलीस अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).*

**प्रत-**

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
*२)* जिल्हा कोषागार अधिकारी, जालना
३) निवड नस्ती, पोल-१अ.